# L. C. BILL No. VI OF 2025.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA KRISHNA VALLEY DEVELOPMENT CORPORATION ACT, 1996.

**सन २०२५ चे महाराष्ट्र विधानपरिषद विधेयक क्रमांक ६.**

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९९६ चा महा. १५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.



एचबी ३०६८–१

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ याच्या कलम २ मध्ये, खंड (क) मधील, "(कोयना जल विद्युत वीज प्रकल्प वगळून)" हा मजकूर वगळण्यात येईल. १९९६ चा महा. १५.

घोषणा.

**३.** याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २०२५ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, कोयना जल विद्युत वीज प्रकल्प, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे सोपविण्यात, सुपूर्द करण्यात व हस्तांतरित करण्यात येत आहे ; आणि उक्त प्रकल्पाच्या बाबतीत उपरोक्त प्रारंभाचा दिनांक हा, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ याच्या कलम १५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी, नेमून दिलेला दिनांक असेल. ५२०२५ चा महा. .... १९९६ चा महा. १५.

**उद्देश व कारणे यांचे निवेदन**

महाराष्ट्र राज्याला वाटप केलेले कृष्णा नदीचे पाणी उपयोगात आणण्यासाठी कृष्णा नदी खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्पांना, लाभक्षेत्र विकासाला आणि जल विद्युत ऊर्जा निर्मितीच्या योजनांना चालना देण्यासाठी आणि त्या क्रियान्वित करण्यासाठी विशेष तरतूद करण्याकरिता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ (१९९६ चा महा. १५) अधिनियमित केला आहे.

२. उक्त अधिनियमात, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील जल विद्युत ऊर्जा प्रकल्पांसह, राज्य शासनाकडून, उक्त महामंडळाकडे सोपविलेल्या व सुपूर्द केलेल्या किंवा हस्तांतरित केलेल्या जल विद्युत ऊर्जा प्रकल्पांचे नियोजन, बांधकाम, परिरक्षण व व्यवस्थापन करण्याची तरतूद केली आहे. तथापि, उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (क) द्वारे, कोयना जल विद्युत वीज प्रकल्पाचे नियोजन, बांधकाम, परिरक्षण व व्यवस्थापन, उक्त अधिनियमाच्या कक्षेतून विशेषकरून वगळण्यात आले आहे.

३. उक्त अधिनियम अधिनियमित केल्यापासून, कोयना जल विद्युत ऊर्जा प्रकल्पाचे कार्यान्वयन, व्यवस्थापन व नियंत्रण यांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आलेले आहेत. म्हणून, उक्त प्रकल्प उक्त अधिनियमाच्या कक्षेत आणण्यासाठी आणि उक्त प्रकल्प महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे सुपूर्द करण्यासाठी तसेच त्याचे नियोजन, बांधकाम, परिरक्षण व अधिक चांगले व्यवस्थापन करण्याकरिता, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ याच्या कलम २ च्या खंड (क) मध्ये, सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २१ मार्च, २०२५.

**राधाकृष्ण विखे-पाटील,**
जलसंपदा मंत्री,
(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ).

ɤ

**वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.**

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड १ (२).—**या खंडान्वये, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास हा अधिनियम अंमलात आणण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर उल्लेखिलेला प्रस्ताव, सामान्य स्वरुपाचा आहे.

**सन २०२५ चे वि. प. वि. क्रमांक ६–महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यातील उतारे.)**

**(सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम १५ )**

**१.** ** ** ** ***

व्याख्या. **२.** या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(अ) व (ब) ** ** ** **

(क) " जल विद्युत वीज प्रकल्प " म्हणजे, महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील जल विद्युत वीज प्रकल्प (कोयना जल विद्युत वीज प्रकल्प वगळून) आणि यात अशा प्रकल्पांचे नियोजन, बांधकाम, परिरक्षण व व्यवस्थापन यांचा समावेश असेल आणि तसेच राज्य शासनाकडून महामंडळाकडे सोपविण्यात आलेल्या, स्वाधीन करण्यात आलेल्या किंवा हस्तांतरित करण्यात आलेल्या जल विद्युत वीज प्रकल्पांचासुद्धा त्यात समावेश असेल ;

(ड) ते (के) ** ** ** **

**३.** ते **७१.** ** ** ** **

し

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**[ सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६. ]**

**[ महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. राधाकृष्ण विखे-पाटील,**
जलसंपदा मंत्री
(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ).**]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.